# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लँडफील मध्ये १५.३० लक्ष मे. टन जुन्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रकल्प राबवून जागा मोकळी करण्याबाबत.

**{सार्व.आरो.अभि.विभाग}**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) -२.० अंतर्गत राज्यशासनाने निर्णय क्रमांक स्वमअ/२०२२/ प्र.क्र.९३ /नवि-३४, दिनांक १० ऑगस्ट २०२२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस १० लक्ष मे. टन जुन्या साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याकरिता बायोमार्यनिग प्रकल्प राबविण्यास काही अटी व शर्तीच्या अधिन राहून रु. ४२.८० कोटींस मान्यता प्रदान केलेली आहे. यामध्ये केंद्रशासनाचा हिस्सा रु. १०.७० कोटी, राज्यशासनाचा हिस्सा रु. १४.९८ कोटी आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा (मनपाचा) हिस्सा रु. १७.१२ कोटीस मंजूरी आहे. तथापि नागपूर महानगरपालिकेद्वारे भांडेवाडी येथील लँडफिल साईटचा सर्व्हे करुन जुना जमा कचरा १५.३० लक्ष मे. टन असून त्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरीता रु. ८३,६५,८६,१६८/- (GST वगळून) च्या अंदाजपत्रकास नोडल ऐजन्सी, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी तांत्रिक मान्यता दिनांक १६.०५.२०२३ ला प्रदान केलेली आहे. भांडेवाडी येथील लँडफिल मधील १५.३० लक्ष मे. टन जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरीता निविदा काढून ऑपरेटर नियुक्त करणे व त्याकरीता मनपाचा हिस्सा व लागणारा अधिकचा खर्चास मा. प्रशासक, नागपूर महानगरपालिका यांचे ठराव क्र. ४२६/मनपा/प्रशासक, दिनांक २०.०६.२०२३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्राप्त मंजुरीन्वये विषयांकीत कामास्तव निविदा दिनांक २२.०६.२०२३ ला प्रसिध्द करण्यात आली असता खालीलप्रमाणे दोन पात्र निविदाकारांनी सहभाग नोंदविला.

१. मे. झिग्मा ग्लोबल एन्वार्यन सोल्युशनस् प्रा. लि., चेन्नई
२. मे. भुमी ग्रीन एनर्जी, पुणे

दोन्ही निविदाकारांच्या तांत्रिक निविदा दिनांक ०६.०९.२०२३ ला उघडण्यात येवून मनपास्तरीय तांत्रिक तपासणी समिती समक्ष ठेवण्यात येवून तपासणी करण्यात आली. त्यामध्ये दोन्ही निविदाकार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याबाबत अहवाल दिनांक ०३.१०.२०२३ च्या बैठकीत देण्यात आला.

करीता, दोन्ही तांत्रिक दृष्टया पात्र निविदाकारांच्या आर्थिक निविदा दिनांक ०४.१०.२०२३ ला उघडण्यात आल्यात. यामध्ये निम्नत्तम निविदाकार (L१) मे. झिग्मा ग्लोबल एन्वार्यन सोल्युशनस् प्रा. लि., चेन्नई यांची प्रति टन रु. ८९६/- प्रमाणे रु. १३७,०८,८०,०००/- ची निविदा प्राप्त झाली. निम्नत्तम निविदाकार यांनी वाटाघाटी नंतर रु. ७८०/- प्रति टनच्या दरावर काम करण्याची तयारी त्यांचे दिनांक २७.१०.२०२३ चे पत्रान्वये कळविलेली असून एकूण प्रकल्प राशी रु. ११९,३४,००,०००/- इतकी राहील. निम्नत्तम निविदाकाराद्वारे सादर दराबाबत अति. आयुक्त (शहर), मनपा यांचे अध्यक्षतेखाली मनपा अधिकाऱ्यांच्या दिनांक ०२.११.२०२३ च्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात येवून मे. झिग्मा ग्लोबल एन्वार्यन सोल्युशनस् प्रा. लि., चेन्नई यांनी सादर केलेले दर रु. ७८०/- प्रति टन स्विकारहार्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले व ही बाब मा. आयुक्त, मनपा यांचे निर्दशनास आणून दिली असता त्यांनी दिनांक १६.११.२०२३ ला कार्यादेश प्राकलनीय परिमाणाच्या मर्यादेत ठेवून मंजूरी प्रदान केली.

करीता, नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लँडफील मध्ये १५.३० लक्ष मे. टन जुन्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रकल्प राबवून जागा मोकळी करण्याचे कामाकरीता निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त निम्नतम निविदाकार (L१) मे. झिग्मा ग्लोबल एन्वार्यन सोल्युशनस् प्रा. लि., चेन्नई यांचे वाटाघाटीनंतर प्राप्त

दर रु. ७८०/- प्रति टन प्रमाणे एकूण रु. ११९,३४,००,०००/- प्रकल्प राशीस, तसेच प्रथमत: १०.५ लक्ष टन जुना जमा कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करुन जागा मोकळी करण्याकरीता कार्यादेश सिमीत ठेवून निर्गमित करण्याचे व याव्यतिरिक्त जुना जमा कचरा शिल्लक असल्यास उक्त मंजूर दरावरच निम्नतम निविदाकारास (निविदेत नमूद असल्याप्रमाणे १५.३० लक्ष मे.टन च्या मर्यादेत) अतिरिक्त कार्यादेश देवून संपूर्ण जागा मोकळी करुन घेण्याचा व आजपावेतो करण्यात आलेल्या संपूर्ण प्रक्रियेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिपः-

१. सदर्हु प्रकल्पाकरिता लागणारा खर्च हा स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत प्राप्त निधीतून आणि मनपाचा हिस्सा व अधिकचा खर्च हा पद क्रमांक A४४२०१२७२२०२ मधुन करण्यात येईल.
२. सविस्तर माहिती नस्तीमधे उपलब्ध आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 619/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 17/11/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लँडफील मध्ये १५.३० लक्ष मे. टन जुन्या कच-यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रकल्प राबवून जागा मोकळी करण्याबाबत.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)-२.० अंतर्गत राज्यशासनाने निर्णय क्रमांक स्वमअ/२०२२/ प्र.क्र.९३ /नवि-३४, दिनांक १० ऑगस्ट २०२२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस १० लक्ष मे. टन जुन्या साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याकरिता बायोमायंनिग प्रकल्प राबविण्यास काही अटी व शर्तीच्या अधिन राहून रु. ४२.८० कोटींस मान्यता प्रदान केलेली आहे. यामध्ये केंद्रशासनाचा हिस्सा रु. १०.७० कोटी, राज्यशासनाचा हिस्सा रु. १४.९८ कोटी आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा (मनपाचा) हिस्सा रु. १७.१२ कोटीस मंजूरी आहे. तथापि नागपूर महानगरपालिकेद्वारे भांडेवाडी येथील लँडफिल साईटचा सर्व्हे करुन जुना जमा कचरा १५.३० लक्ष मे. टन असून त्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरीता रु. ८३,६५,८६,१६८/- (GST वगळून) च्या अंदाजपत्रकास नोडल ऐजन्सी, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी तांत्रिक मान्यता दिनांक १६.०५.२०२३ ला प्रदान केलेली आहे. भांडेवाडी येथील लँडफिल मधील १५.३० लक्ष मे. टन जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरीता निविदा काढून ऑपरेटर नियुक्त करणे व त्याकरीता मनपाचा हिस्सा व लागणारा अधिकचा खर्चास मा. प्रशासक, नागपूर महानगरपालिका यांचे ठराव क्र. ४२६/मनपा/प्रशासक, दिनांक २०.०६.२०२३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्राप्त मंजुरीन्वये विषयांकीत कामास्तव निविदा दिनांक २२.०६.२०२३ ला प्रसिध्द करण्यात आली असता खालीलप्रमाणे दोन पात्र निविदाकारांनी सहभाग नोंदविला.

१. मे. झिग्मा ग्लोबल एन्वार्यन सोल्युशनस् प्रा. लि., चेन्नई
२. मे. भुमी ग्रीन एनर्जी, पुणे

दोन्ही निविदाकारांच्या तांत्रिक निविदा दिनांक ०६.०९.२०२३ ला उघडण्यात येवून मनपास्तरीय तांत्रिक तपासणी समिती समक्ष ठेवण्यात येवून तपासणी करण्यात आली. त्यामध्ये दोन्ही निविदाकार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याबाबत अहवाल दिनांक ०३.१०.२०२३ च्या बैठकीत देण्यात आला.

करीता, दोन्ही तांत्रिक दृष्टया पात्र निविदाकारांच्या आर्थिक निविदा दिनांक ०४.१०.२०२३ ला उघडण्यात आल्यात. यामध्ये निम्नत्तम निविदाकार (L१) मे. झिग्मा ग्लोबल एन्वार्यन सोल्युशनस् प्रा. लि., चेन्नई यांची प्रति टन रु. ८९६/- प्रमाणे रु. १३७,०८,८०,०००/- ची निविदा प्राप्त झाली. निम्नत्तम निविदाकार यांनी वाटाघाटी नंतर रु. ७८०/- प्रति टनच्या दरावर काम करण्याची तयारी त्यांचे दिनांक २७.१०.२०२३ चे पत्रान्वये कळविलेली असून एकूण प्रकल्प राशी रु. ११९,३४,००,०००/- इतकी राहील. निम्नत्तम निविदाकाराद्वारे सादर दराबाबत अति. आयुक्त (शहर), मनपा यांचे अध्यक्षतेखाली मनपा अधिकाऱ्यांच्या दिनांक ०२.११.२०२३ च्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात येवून मे. झिग्मा ग्लोबल एन्वार्यन सोल्युशनस् प्रा. लि., चेन्नई यांनी सादर केलेले दर रु. ७८०/- प्रति टन स्विकारहार्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले व ही बाब मा. आयुक्त, मनपा यांचे निर्देशनास आणून दिली असता त्यांनी दिनांक १६.११.२०२३ ला कार्यादेश प्राकलनीय परिमाणाच्या मर्यादेत ठेवून मंजूरी प्रदान केली.

करीता, नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लँडफील मध्ये १५.३० लक्ष मे. टन जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रकल्प राबवून जागा मोकळी करण्याचे कामाकरीता निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त निम्नतम निविदाकार (L१) मे. झिग्मा ग्लोबल एन्वार्यन सोल्युशनस् प्रा. लि., चेन्नई यांचे वाटाघाटीनंतर प्राप्त दर रु. ७८०/- प्रति टन प्रमाणे एकूण रु. ११९,३४,००,०००/- प्रकल्प राशीस, तसेच प्रथमत: १०.५ लक्ष टन जुना जमा कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करुन जागा मोकळी करण्याकरीता कार्यादेश सिमीत ठेवून निर्गमित करण्याचे व याव्यतिरिक्त जुना जमा कचरा शिल्लक असल्यास उक्त मंजूर दरावरच निम्नतम निविदाकारास (निविदेत नमूद असल्याप्रमाणे १५.३० लक्ष मे.टन च्या मर्यादेत) अतिरिक्त कार्यादेश देवून संपूर्ण जागा मोकळी करुन घेण्याचा व आजपावेतो करण्यात आलेल्या संपूर्ण प्रक्रियेस मान्यता प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.